# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 01 September 2025
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक ०१ सप्टेंबर २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- आत्मनिर्भरता आणि 'व्होकल फॉर लोकल' हा मंत्र घेऊन मार्गक्रमण करा–मन की बातमधून पंतप्रधानांचं आवाहन
- ग्रामीण भागातल्या रस्त्यांना विशिष्ट संकेतांक देण्याची नावीन्यपूर्ण कार्यपद्धती निश्चित
- ज्येष्ठा कनिष्ठा गौरींचं पारंपरिक पद्धतीने घरोघरी आगमन–आज पूजनाचा सोहळा
- प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया मराठे यांचं कर्करोगाने निधन

आणि

- आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेत जपानवर मात करत भारताचा सुपर फोरमध्ये प्रवेश

****

आत्मनिर्भरता आणि 'व्होकल फॉर लोकल' हा मंत्र घेऊन विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करण्याचं आवाहन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रम मालिकेच्या १२५ व्या भागात ते बोलत होते. आगामी सणासुदीच्या दिवसात आपला पोशाख, घरातली सजावट, भेटवस्तू वगैरे सर्व गोष्टी स्वदेशी असाव्यात, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. ते म्हणाले...

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

यूपीएससी परीक्षेत यशाची संधी थोडक्यात गेलेल्या उमेदवारांची माहिती देणारं प्रतिभासेतू हे डिजिटल व्यासपीठ तयार करण्यात आलं असून, या द्वारे खासगी कंपन्या या उमेदवारांना नोकरी देणार आहेत. अनेक उमेदवारांना याचा लाभ झाल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं.

१७ सप्टेंबरला देशभरात साजऱ्या होत असलेल्या हैदराबाद मुक्तीसंग्राम दिवसाचा उल्लेख करत, पंतप्रधानांनी तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी राबवलेल्या ऑपरेशन पोलोचा, तसंच भारतरत्न डॉक्टर बाबासहेब आंबेडकर यांनी या संदर्भात बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा पंतप्रधानांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले..

**बाईट – पंतप्रधान नरेंद्र मोदी**

जम्मू काश्मीरमध्ये झालेला 'खेलो इंडिया' जलक्रीडा महोत्सव, देशातले वाढते सौरऊर्जा प्रकल्प, देशभरात अतिवृष्टी आणि इतर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेली जीवित तसंच वित्तहानी, भारतीय संस्कृतीचा विदेशातला प्रभाव, यासोबतच अभियंता मोक्षगुंडम विश्वेश्वरैय्या यांची जयंती, विश्वकर्मा जयंती, आदी पर्वांचाही पंतप्रधानांनी कालच्या भागात उल्लेख केला.

****

मराठा आरक्षणाबाबत मनोज जरांगे पाटील यांच्याकडून आलेल्या प्रस्तावावर राज्य सरकार कायदेशीर मार्गदर्शन घेत असल्याचं जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात स्थापन मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक मंत्री विखे पाटील यांच्या निवासस्थानी काल झाली. राज्यघटनेत बदल करून आरक्षणाचा प्रश्न निकाली काढण्याचा सल्ला देणारे शरद पवार केंद्रात मंत्री असताना गप्प का बसले, असा प्रश्न विखे पाटील यांनी यावेळी उपस्थित केला.

****

दरम्यान, आजपासून उपोषणाची तीव्रता वाढवणार असल्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. जरांगे-पाटील यांच्या आंदोलनाचा आज चौथा दिवस आहे. डॉक्टरांच्या पथकाने काल त्यांची प्रकृती तपासली आणि रक्तदाब तसंच मधुमेह अहवाल नियमित असल्याचा निर्वाळा दिला.

****

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी काल जरांगे यांची उपोषणस्थळी भेट घेतली. पैठणचे आमदार विलास भुमरे यांनीही काल जरांगे यांची भेट घेतली. आंदोलनकर्त्यांच्या भावना शासन दरबारी मांडणार असल्याचं भुमरे यांनी सांगितल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

ग्रामीण भागातील रस्ते, गाडीमार्ग, पायमार्ग आणि शेतरस्त्यांचे सीमांकन करून त्यांना विशिष्ट संकेतांक देण्याची नावीन्यपूर्ण कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. प्रत्येक गावातील ग्रामसेवक, तलाठी, कोतवाल आणि पोलीस पाटील यांच्या मदतीने गावातील सर्व रस्त्यांची यादी तयार केली जाईल, आणि त्यानंतर हा संकेतांक दिला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना बारमाही रस्त्यांची सुविधा मिळण्यासह अतिक्रमणाच्या समस्येवर नियंत्रण मिळणार आहे.

****

ज्येष्ठा कनिष्ठा गौरींचं काल घरोघरी आगमन झालं. महिला वर्गाने वाजतगाजत गौराईचं स्वागत करत, सजवलेल्या मखरात तिची स्थापना केली. आज घरोघरी गौरी पूजन सोहळा साजरा होत आहे. आज दुपारनंतर गौरींना घरोघरच्या परंपरेनुसार पंचपक्वान्नांसह सोळा भाज्यांचा नैवेद्य अर्पण करून त्यांचं मनोभावे पूजन केलं जाईल. यासाठी आज सकाळपासूनच बाजारपेठांमधून गर्दी झाली आहे. उद्या गौरी विसर्जनाने या तीन दिवसांच्या सोहळ्याची सांगता होईल.

दरम्यान, पाच दिवसांच्या गणपतींचं काल ठिकठिकाणी विसर्जन झालं. नागरिकांनी आपापल्या परिसरातल्या पाणवठ्यांवर तसंच कृत्रीम जलाशयांवर गणरायाला निरोप देण्यासाठी गर्दी केली होती.

****

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी काल मुंबईत विविध मंडळांना भेट देऊन गणरायाचं दर्शन घेतलं.

खासदार अशोक चव्हाण यांनी काल नांदेड इथं लोकमान्य टिळक गणेश मंडळाला भेट देऊन गणरायाचं दर्शन घेतलं. छत्रपती संभाजीनगर इथं खासदार डॉक्टर भागवत कराड यांनी हडको एन-9 इथल्या मृत्युंजय गणेश मंडळाला भेट देऊन गणरायाचं दर्शन घेतलं. या मंडळाने ऑपरेशन सिंदूरवर आधारित देखावा सादर केला आहे.

**

नांदेडच्या राष्ट्रसंत पाचलेगावकर महाराजांच्या मुक्तेश्वर आश्रमाच्या रचनात्मक कार्यासाठी पुण्याच्या गुरुजी तालीम गणेश मंडळाकडून पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. मानचिन्ह आणि २१ हजार रुपये या स्वरुपाचा हा पुरस्कार आश्रमाचे अध्यक्ष सुधाकर टाक यांनी काल स्वीकारला. शेकडो गणेशभक्तांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला.

****

अभिनेत्री प्रिया मराठे यांचं काल पहाटे मुंबईत निधन झालं. त्या ३८ वर्षांच्या होत्या. गेल्या काही काळापासून त्या कर्करोगानं ग्रस्त होत्या. तू तिथे मी, या सुखांनो या, पवित्र रिश्ता, या दूरचित्रवाणी मालिकांसह अनेक चित्रपटांतूनही त्यांनी भूमिका केल्या होत्या. काल सायंकाळी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

लातूर जिल्ह्याच्या अहमदपूर तालुक्यातील टाकळगाव इथले मराठा आंदोलक विजयकुमार घोगरे यांचं परवा मुंबईत आझाद मैदानावर मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान निधन झालं होतं. त्यांच्या पार्थिव देहावर त्यांच्या मूळगावी काल अंत्यसंस्कार करण्यात आले.

****

आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेत काल भारताने जपानवर ३-२ अशी मात केली. बिहारमध्ये राजगीर इथं झालेल्या या चुरशीच्या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार हरमनप्रीत सिंग याने दोन गोल केले तर मनदीपने एक गोल केला. हा सामना जिंकून भारताने सुपर-४ मध्ये प्रवेश केला आहे.

****

कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाच्या आमदार संजना जाधव यांनी काल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांची भेट घेतली. यावेळी कन्नड तालुक्यातील विविध विकासकामांच्या संदर्भात चर्चा झाल्याचं वृत्त आहे.

****

ग्रामविकास विभागाच्या वतीनं 'मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान' राबवण्यात येणार आहे. या अभियानात सहभागी गावातील लोकांनी थकीत कर एकरकमी भरल्यास त्यांना थेट ५० टक्के सवलत देण्याची ग्वाही राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिली. ते काल सोलापूर इथं बोलत होते. सलग पाच वर्ष कर थकवणाऱ्यांवर निवडणूक निर्बंध घालण्याचा इशाराही त्यांनी दिला.

****

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड पंचायत समिती आणि महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमानं काल भटके विमुक्त दिवस साजरा करण्यात आला. भटके विमुक्त जातीतल्या ६० लाभार्थींना घरकुल मंजुरीचे आदेश तसंच महसूल विभागाकडून जातीचे प्रमाणपत्र, सातबारा वाटप यावेळी करण्यात आलं.

****

हिंगोली जिल्ह्याच्या आखाडा बाळापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत शिवसेना पुरस्कृत सत्ताधारी गटाच्या शिव शेतकरी विकास पॅनलनं १८ पैकी तब्बल १७ जागा जिंकल्या आहेत. एका जागी अपक्षानं विजय मिळविला.

****

नांदेड आकाशवाणी केंद्रात कार्यरत वरिष्ठ तंत्रज्ञ राजेंद्र गंगाखेडकर काल ३६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. नांदेड आकाशवाणी केंद्रात त्यांना छोटेखानी समारंभात निरोप देण्यात आला.

****

परभणीचे जिल्हाधिकारी संजय चव्हाण यांनी काल पुयनी–पालम रस्त्याला भेट दिली. इथला पर्यायी वळण रस्ता पावसात वाहून गेला, या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी चव्हाण यांनी यावेळी दिले. दरम्यान, चव्हाण यांनी शेत पिकांच्या नुकसानीचीही पाहणी केली.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणात सध्या १७ हजार २३९ दशलक्ष घनमीटर प्रतिसेकंद या वेगाने पाण्याची आवक सुरु असून गोदापात्रात नऊ हजार ४०० दशलक्ष घनफूट प्रति सेकंद या वेगाने विसर्ग सुरु आहे.

बीड जिल्ह्यातल्या मांजरा धरणातून सुमारे साडे तीन हजार दशलक्ष घनफुट, नांदेडच्या विष्णुपुरी धरणातून सुमारे दोन हजार तर हिंगोली जिल्ह्यातल्या सिद्धेश्वर धरणाच्या १४ दरवाजांमधून १४ हजार ६८१ दशलक्ष घनफूट प्रतिसेकंद या वेगाने विसर्ग सुरु आहे.

****

हवामान

कोकण मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागात हवामान विभागाने आज आणि उद्या यलो अलर्ट दिला आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात आज पावसाची शक्यता आहे. बीड आणि धाराशिव वगळता उर्वरित मराठवाड्यात उद्यासाठीही यलो अलर्ट देण्यात आला आहे.

****